जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१८/१७०
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक:- ०४/०१/२०१८

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी-२०१८**
**प्रिलिस्ट मध्ये ऑनलाईन दुरुस्ती करणेबाबत .....**

शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी-२०१८ ची प्रिलिस्ट परिषदेच्या संकेतस्थळावर **दिनांक ०९ जानेवारी** २०१८ रोजी जाहिर करण्यात येणार आहे. सदरच्या प्रिलिस्टमध्ये काही दुरुस्ती असल्यास त्या दुरुस्त्या **दिनांक १२ जानेवारी २०१८ रोजी अखेर** परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर लॉगिनव्दारे (Login) ऑनलाईन कराव्यात. त्याकरीता खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रिलिस्ट मधील विद्यार्थ्यांच्या नावातील स्पेलिंग दुरुस्ती , विषय बदल इत्यादी दुरुस्त्या करता येतील.
२. प्रिलिस्ट मध्ये विद्यार्थ्यांच्या पुर्व-अट बाबतची माहिती भरता येईल/दुरुस्ती करता येईल.
३. प्रिलिस्ट मध्ये विद्यार्थ्याचा फोटो चुकीचा आहे की बरोबर आहे ते नमुद करावे.
४. फोटो दुरुस्तीबाबत :-
   प्रिलिस्टमध्ये फोटो दुरुस्ती विकल्प देण्यात आला आहे. त्यानुसार फोटो दुरुस्ती असल्यास फोटो दुरुस्त करावा. (अचूक फोटो अपलोड करावा.)
५. दि. १२जानेवारी २०१८ रोजी रात्री ११.५९ नंतर प्रिलिस्टमध्ये ऑनलाईन दुरुस्ती करता येणार नाही. प्रिलिस्टबाबतची वेबलिंक दिनांक १२ जानेवारी २०१८ रोजी रात्री ठीक १२.०० वाजता बंद करण्यात येईल.
६. प्रिलिस्टमध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्त्या न केल्यास आणि त्यामुळे परीक्षार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्यास आपण संस्थाचालक म्हणुन सर्वस्वी जबाबदार रहाल. याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

**टिप :- १) प्रिलिस्टमध्ये परीक्षार्थ्यांच्या नावात पुर्णपणे बदल करु नये. तसे केल्यास संबंधित बदल केलेल्या परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र रद्द करण्यात येईल, असे बदल केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही. तसेच संबंधित संस्थेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.**

**२) दुरुस्त्या केवळ ऑनलाईन पध्दतीने प्रिलिस्टमध्येच करता येतील, प्रिलिस्ट नंतर अथवा परीक्षोत्तर टप्प्यावर कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही. याबाबत परिषदेकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करु नये, याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.**

DESKTOP/JAN-2018/PRILIST